नियमित फौजदारी खटला नं.७०/२०२२
निशाणी- १२

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- आश्वीनी विक्रम मकासरे
वयः- ३३ वर्षे, धंदाः- लॅब टेक्नीशिअन.
राहणार- मार्कंडेय सोसायटी, गुलमोहर रोड, अहमदनगर.

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील
श्री.ए.एस.यादव यांचेकडूनः-

१. सन २०२१ साली मी पाऊलबुध्दे फार्मसी कॉलेजवर लॅब टेक्नीशिअन म्हणुन कामाला होते. विलास साळवे हे सुध्दा तेथे शिपाई म्हणुन कामाला होते. दि.०७-११-२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता कॉलेज सुटल्यावर मी पायी घरी येत असताना आरोपीने माझा पाठलाग करुन नविन कलेक्टर ऑफिसच्या पाठीमागे, समर्थ मंदीराच्या रस्त्यावर थांबवले. आरोपी मला माझा नंबर मागत होता. मी त्याला विचारले की, नंबर कशाला पाहिजे. त्यावर आरोपी म्हणाला की, "तु मला आवडती". मी त्याला समजून सांगायला लागले असता आरोपी चिडला व मला शिवीगाळ करायला लागला व पोलीसात तक्रार दिली तर बघुन घेईल अशी तक्रार दिली. त्यानंतर मी व माझे पतीने पोलीस स्टेशनला जावून तक्रार दिली. त्यानंतरही आरोपीचे मला मोबाईलवर मेजेस पाठवणे व माझा पाठलाग करणे थांबले नाही.

२. दि.२०-०३-२०२० रोजी आरोपीचे माझे मोबाईलवर मेसेज आले होते. त्या मेसेजमध्ये असा मजकुर होता की, "तु मला आवडते, मी तुला सांभाळण्यास तयार आहे". सदर मसेजे व्हॉटसअॅपवर आले होते. आरोपीचा मोबाईल क्रमांक ९५५२२८३२..... असा होता. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जावून तक्रार दिली. त्यानंतरही आरोपी मला शिवीगाळ करु लागला. त्यानंतरही आरोपी मला मेसेज पाठवत होता व पाठलाग करत होता. त्यानंतर मी कॉलेजमध्ये लेखी तक्रार दिली. त्यानंतर त्याला कामावरुन काढून टाकले.

३. दि.२४-०३-२०२१ रोजी रात्री ११.०० वाजता आरोपी माझे घराचे बाहेर हातात तलवार घेऊन आला. आरोपी घरासमोर उभा राहून आम्हाला शिवीगाळ करत होता. त्यावेळी आजूबाजूचे लोक जमा झाल्याने आरोपी तेथून पळून गेला. दुस-यादिवशी आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी फिर्याद घेतली नाही.

४. दि.२८-०३-२०२१ रोजी रात्री ११.०० वाजता आरोपी आमच्या घराबाहेर आला. मी घरात होते व माझे पती घराबाहेर चालत होते. त्यावेळी आरोपी हातात तलवार घेऊन आला. आरोपी घरात आला व मला म्हणाला की, "तुझ्यामुळे माझी नोकरी गेली". मी त्यास समजुन सांगत असताना त्याने माझा डावा हात ओढला, मला मिठी मारली व माझे छातीला हात लावला. मी आरडाओरडा केला असता माझे पती तेथे आले. त्यावेळी आरोपीने आम्हाला सर्वांना बघून घेण्याची धमकी दिली व पळून गेला. त्यानंतर दुस-या दिवशी पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेलो. पोलीसांनी फिर्याद घेतली नाही. त्यानंतर आम्ही एसपी ऑफिसला अर्ज केला. त्यांच्या सांगण्यावरुन तोफखाना पोलीसांनी गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा पोलीसांनी दि.१४-०६-२०२१ रोजी दाखल केला. मी एसपी ऑफिसला जो अर्ज दाखल केला होता त्याची प्रत माझेकडे आहे, ती मी दाखल करु शकते. मी सुरुवातीला दिलेल्या तक्रारीच्या प्रती माझेकडे आहे, ते मी दाखल करु शकते. मी पोलीसांना घटनास्थळ दाखवले होते. मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यातील घटनास्थळाचे वर्णन बरोबर आहे.

५. त्यानंतर न्यायालयात माझा जबाब नोंदवला होता. सदर जबाब मला दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.१३ देण्यात येत आहे. मी आरोपीला ओळखते. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**(**अभियोग पक्षाच्या विनंतीवरुन उर्वरीत सरतपास तहकूब करण्यात आला.**)**

श्रवणोत्तर स्वीकृत, समक्ष,

( रा. धों. चव्हाण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

( रा. धों. चव्हाण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

<u>उर्वरीत सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री.के. एम. कोठुळे यांचेकडूनः-</u>

६. मला आता दि. २०-०३-२०२० रोजीची एन. सी. दाखविली ती मीच दाखल केलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.१६ देण्यात येते. दि. ०७-११-२०१९ रोजीची एन. सी. दाखविली ती मीच दाखल केलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.१७ देण्यात येते. दि. २९-०३-२०२१ रोजी पोलीस अधिक्षक यांना तक्रार दिली होती, मला आता दाखविलेली तक्रारीची प्रत तीच आहे, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.१८ देण्यात येते. या घटनेसंदर्भात मी पोलीस स्टेशनला तक्रार केली होती. मला आता दाखविलेली तक्रार तीच आहे, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास नि. १९ देण्यात येते.

७. ज्या तलवारीने मला धाक दाखविला ती तलवार मला दाखविल्यास ती मी ओळखु शकते. आता मला जी तलवार दाखविली, ती तीच आहे, त्यास अर्टिकल 'अ' देण्यात येते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.तरकसे यांचेकडूनः-</u>

८. हे म्हणणे खरे आहे की, नि.१६ ते नि.१८ या पोलीसांना तपासा दरम्यान मी दिल्या नव्हत्या. नि. १६ व नि. १७ वर पोलीस स्टेशनचा शिक्का नाही. मेसेजचे स्क्रीन शॉट काढुन पोलीसांना दिले नव्हते. साक्षीदार सांगते की, पोलीसांना दाखविले होते, त्यांनी मागितले नव्हते म्हणुन दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९-०३-२०२० रोजी आरोपीने मला शिवीगाळ केली नव्हती, म्हणुन मी नि. १६ चा कागद पोलीसांना तपासा दरम्यान दिला नाही.

९. नि. १६ ची एन. सी. देताना मी पोलिसांना सांगितले होते की, 'दि.२०-०३-२०२० रोजी आरोपीचे माझे मोबाईलवर मेसेज आले होते. त्या मेसेजमध्ये असा मजकुर होता की, "तु मला आवडते, मी तुला सांभाळण्यास तयार आहे". सदर मेसेज व्हॉटसअॅपवर आले होते' सदर मजकुर नि. १६ मध्ये नमुद नाही त्याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की,नि. १९ ची फिर्याद देताना देखिल मी सदर व्हॉटसअॅपबाबतचा मजकुर पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर नि. १९ मध्ये नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. २०-०३-

२०२० रोजी आरोपीने मला असा कोणताही मेसेज व्हॉटसअॅप केला नव्हता, म्हणुन त्याबाबत नि. १९ मध्ये मजकुर नमुद नाही. नि. १३ च्या जबाबामध्ये देखिल सदर मजकुर नमुद नसण्याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की,नि.१६ च्या एन. सी. मध्ये आरोपीने मला 'आय लव्ह यु' असा मेसेज केल्याचे नमुद नाही. दि. १९-०३-२०२० रोजी घटना घडली असे नि. १६ मध्ये नमुद आहे, पंरतु मी एक दिवस उशिराने एन. सी. दाखल केली. त्याचे कारण त्यावेळेस करोनाचा काळ होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द पुरावा तयार व्हावा म्हणुन मी जाणीवपूर्वक दि. १९-०३-२०२० रोजी कोणतीही घटना घडलेली नसताना, दि. २०-०३-२०२० रोजी खोटी तक्रार दिली.

१०. दि. ०७-११-२०१९ रोजी मी पाऊलबुध्दे कॉलेजला होते. त्यादिवशी आरोपीची तक्रार मी कॉलेजमधील माझ्या वरिष्ठाकडे केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रार मी लेखी स्वरुपात दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७-११-२०१९ रोजी आरोपीने मला त्रास दिला नव्हता म्हणुन मी वरिष्ठाकडे लेखी तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला त्रास देण्यासाठी मी जाणीवपूर्वक नि.१७ ची खोटी एन. सी. दाखल केली आहे.

११. नि. १७ ची एन. सी. देताना मी पोलीसांना सांगितले होते की, 'दि.०७-११-२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता कॉलेज सुटल्यावर मी पायी घरी येत असताना आरोपीने माझा पाठलाग करुन नविन कलेक्टर ऑफिसच्या पाठीमागे, समर्थ मंदीराच्या रस्त्यावर थांबवले'. नि. १७ मध्ये सदर मजकुर नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. 'आरोपी मला माझा नंबर मागत होता. मी त्याला विचारले की, नंबर कशाला पाहिजे. त्यावर आरोपी म्हणाला की, "तु मला आवडती". मी त्याला समजून सांगायला लागले असता आरोपी चिडला व मला शिवीगाळ करायला लागला व पोलीसात तक्रार दिली तर बघुन घेईल अशी तक्रार दिली' असे मी सांगितले होते, परंतु नि. १७ मध्ये सदर मजकुर नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येणार नाही. नि. १९ मध्ये दि.०७-११-२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता ची घटना नमुद नाही, त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, नि.१८ मध्ये तक्रारदार विक्रम रघुनाथ मकासरे हे आहेत, मी तक्रारदार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रार पोलीस स्टेशनला

नोंदवुन घेत नव्हते म्हणुन आम्ही पोलीस अधिक्षक कार्यालयाकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रारीचे पुढे काय झाले याची चौकशी मी केली नाही. दि. २९-०३-२०२१ रोजी तोफखाना पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. त्या तक्रारीमध्ये मी स्वतः फिर्यादी आहे. पोलीसांना तपासा दरम्यान सदर तक्रार दिली होती. सदर तक्रार नि. १९ वर आहे.

मध्यांतर झाल्यामुळे उलटतपास थोडयावेळा करिता तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

CHARATE HAMPE MANISHA

Digitally signed by CHARATE HAMPE MANISHA
DN: cn=CHARATE HAMPE MANISHA, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950843, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.07.14 17:30:14 +0530

(श्रीमती मनिषा द. चराटे-हंपे)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

अहमदनगर
दि. १४/०७/२०२५

<u>मध्यांतरानंतर शपथेवर उलटतपास विधिज्ञ श्री. तरकसे यांचेमार्फत सुरुः-</u>

१३. नि.१९ वरील फिर्याद तोफखाना पोलीस स्टेशन येथे जाधव साहेब यांनी नोंदवुन घेतली नव्हती. ते पुन्हा एन. सी. नोंदवा म्हणत होते आणि आम्ही गुन्हा दाखल करुन घ्या असे सांगत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या ज्या वेळेस पोलीस स्टेशनला गेले त्या त्या वेळी माझ्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी फिर्याद नोंदवुन घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणीवपूर्वक पुन्हा पुन्हा आरोपी विरुध्द खोटी तक्रार देत होते म्हणुन पोलीस माझी तक्रार नोंदवुन घेत नव्हते.

१४. हे म्हणणे खरे आहे की, नि. १८ वरील तक्रारीच्या अनुषंगाने नि. १९ वरील फिर्याद नोंदवुन घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.१९ मध्ये नमुद दि. २४-०३-२०२१ आणि २८-०३-२०२१ रोजीच्या घटना घडल्या नव्हत्या.

१५. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या ठिकाणी राहतो ते घर माझ्या पतीच्या नावावर नाही. आमच्या घरा समोरुन उत्तर दक्षिण असा वाहतुकीचा रस्ता आहे. आमच्या घरासमोर ठुबे सरांचे घर आहे. आमच्या घराच्या उत्तरेला घोडके सरांचे घर आहे. दि. २४-०३-२०२१ आणि २८-०३-२०२१ रोजी ठुबे व घोडके सर त्यांचे घरी होते किंवा काय ते मला सांगता येणार नाही. आमच्या घराच्या दक्षिणेस संजय घोडके यांचे घर आहे. दि.२४-०३-२०२१ आणि २८-०३-२०२१ रोजी संजय घोडके हे त्यांचे

घरी होते किंवा काय ते मला सांगता येणार नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की, प्रशांत त्रींबके हे माझ्या पतीचे चांगले मित्र आहेत.

| | |
|---|---|
| प्रश्न | दि. २४-०३-२०२१ आणि २८-०३-२०२१ रोजी प्रशांत त्रींबके तुमच्या घरी होते ? |
| उत्तर | आवाज ऐकुन ते आले होते. |

१७. असे म्हंटले तर बरोबर होईल की, दि. २४-०३-२०२१ आणि २८-०३-२०२१ रोजी आवाज ऐकुन फक्त प्रशांत त्रींबके हे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रशांत त्रींबके माझ्या पतीचे मित्र असल्यामुळे त्याचे नाव साक्षीदार म्हणुन मी पोलीसांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४-०३-२०२१ आणि २८-०३-२०२१ रोजी आरोपी आमच्या घरी आला नव्हता.

१८. पाऊलबुध्दे कॉलेजमध्ये मी काम करते याबाबत कागदोपत्री पुरावा मी तपासा दरम्यान पोलीसांना दिला नाही. आरोपी विरुध्द पाऊलबुध्दे कॉलेजमध्ये दिलेल्या तक्रारी मी पोलीसांना दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी वेळोवेळी खोटया तक्रारी आरोपी विरुध्द केल्या म्हणुन त्या पोलीसांना दिल्या नाहीत.

१९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्याकडुन रक्कम रुपये पन्नास हजार उसनवार घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पती आरोपीस वारंवार पैशाची मागणी करत होते आणि आरोपी नकार देत होता. हे म्हणणे खरे नाही की, या कारणावरुन आरोपीची नोकरी घालविण्यासाठी मी तो काम करीत असलेल्या ठिकाणी खोटया व बनावट तक्रारी दिल्या. हे म्हणणे खरे नाही की, वारंवार मागुन देखिल आरोपीने पैसे दिले नाही म्हणुन दि. २४-०३-२०२१ आणि २८-०३-२०२१ रोजीच्या खोटया घटना नमुद करुन नि. १९ ची फिर्याद दिली आहे.

२०. हे म्हणणे खरे नाही की, 'दि.२८-०३-२०२१ रोजी रात्री ११.०० वाजता आरोपी आमच्या घराबाहेर आला. मी घरात होते व माझे पती घराबाहेर चालत होते. त्यावेळी आरोपी हातात तलवार घेऊन आला. आरोपी घरात आला व मला म्हणाला की, "तुझ्यामुळे माझी नोकरी गेली", मी त्यास समजुन सांगत असताना त्याने माझा डावा हात ओढला, मला मिठी मारली व माझे छातीला हात लावला. मी आरडाओरडा केला असता माझे पती तेथे आले. त्यावेळी आरोपीने आम्हाला सर्वांना बघून घेण्याची धमकी

दिली व पळून गेला' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, 'दि.२४-०३-२०२१ रोजी रात्री ११.०० वाजता आरोपी माझे घराचे बाहेर हातात तलवार घेऊन आला. आरोपी घरासमोर उभा राहून आम्हाला शिवीगाळ करत होता. त्यावेळी आजूबाजूचे लोक जमा झाल्याने आरोपी तेथून पळून गेला' हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की,वर नमुद घटना या खोटया स्वरुपाच्या असल्यामुळे पोलिसांनी आमची तक्रार नोंदवुन घेतली नाही.

२१. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटना घडल्यानंतर आरोपीने रक्कम रुपये पन्नास हजार परत दिले परंतु व्याजाच्या हव्यासापोटी आरोपी विरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की,आरोपी अर्टिकल 'अ' ची तलवार घेऊन आमच्या घरी आला होता हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

CHARATE HAMPE MANISHA
Digitally signed by CHARATE HAMPE MANISHA
DN: cn=CHARATE HAMPE MANISHA, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950843, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.07.14 17:30:24 +0530

(श्रीमती मनिषा द. चराटे-हंपे)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर

दि. १४/०७/२०२५
अहमदनगर